**नियमित दिवाणी दावा क्र.८४/२०१८**

**निशाणी क्र.५ वरील आदेश**

वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तात्पुरता मनाई हुकुम मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मौजे हिवरे, ता.करमाळा, जि.सोलापूर हद्दीतील ग.क्र.१०/२ पैकी ०हे.६०आर या मिळकतीकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

**वादी यांचे अर्जाचे थोडक्यात कथन की,**

३. ग.क्र.१०/२ क्षेत्र २हे.४७आर पोटखराब ०हे.३आर ही मिळकत वादी यांना त्यांच्या कौटुंबिक वाटणीमध्ये प्राप्त झाली. त्यांनी सदर मिळकतीचे त्यांची पत्नी सुभद्राबाई, मुलगा हनुमंत (प्रतिवादी क्र.१), दुसरा मुलगा श्रीमंत (प्रतिवादी क्र.२) यांच्या नांवे वाटप करून दिले. सदर वाटपान्वये ग.क्र.१०/२ पैकी ०हे.८०आर जमीन प्रतिवादी क्र.१ यांना मिळाली, ०हे.८७ आर जमीन सुभद्राबाई यांना मिळाली, पश्चिमेकडील ०हे.८० आर जमीन प्रतिवादी क्र.२ यांना दिली व त्या अन्वये उपविभागीय अधिकारी कुर्डुवाडी यांनी त्यांचा आदेश क्र.एसआर/०७/२००० अन्व्ये ग.क्र.१०/२ पैकी ०हे.८० आर जमीन सिना–कोळगाव लाभ क्षेत्राकरीता संपादित करण्यात आली व तसेच फेरफार नोंद क्र.१२०३ अन्वये नोंदविण्यात आली. कौटुंबिक वाटणीची नोंद २०१३ साली फेरफार नोंद क्र.१७१० अन्वये झाली परंतु तत्पूर्वी सुभद्राबाई यांचा मृत्यु दि.०९.०७.२००३ साली झाला होता. सिना–कोळगाव

प्रकल्पासाठी संपादित झालेली जमीन ही सुभद्राबाई यांच्या क्षेत्रातील २७आर, प्रतिवादी क्र.१ यांच्या क्षेत्रातील २७आर, प्रतिवादी क्र.२ यांच्या क्षेत्रातील २७आर जमीन संपादित झाली होती. प्रतिवादी क्र.१ यांची ०हे.५३आर, प्रतिवादी क्र.२ यांची ०हे.५४आर व सुभद्राबाई यांची ०हे.६०आर शिल्लक जमीन राहिली होती. प्रतिवादी व सुभद्राबाई हे कामानिमित्ताने पुणे येथे राहावयास असल्याने संपूर्ण मिळकत वादी यांच्या वहिवाटीत होती. वादी हे देखील सुभद्राबाई यांचे मुलांसह वारस आहेत यांचा देखील सुभद्राबाई यांच्या मिळकतीमध्ये १/३ हिस्सा आहे असे असताना प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांच्या स्वतःच्या नावाची नोंद फेरफार क्र.१८९७ अन्वये लावून घेतली व वादी यांच्या निदर्शनास सदर बाब आल्यानंतर त्यांनी दि.२७.१०.२०१७ रोजी उपविभागीय अधिकारी कुर्डुवाडी यांचेकडे सदर नोंदीच्या विरोधात अपील दाखल केले. प्रतिवादी क्र.३ यांनी ग.क्र.१०/२ पैकी ०हे.८०आर जमीन प्रतिवादी क्र.३ यांना व प्रतिवादी क्र.२ यांना ०हे.८०आर जमीन, प्रतिवादी क्र.२ यांनी ०हे.८०आर जमीन प्रतिवादी क्र.४ यांना विक्री केली. प्रतिवादी क्र.१ व २ यांची प्रत्येकी ५३ आर, ५४आर जमीन शिल्लक असताना प्रतिवादी क्र.१ व२ यांनी संगनमताने प्रत्येकी ८० आर जमीन विक्री केली.

४. वादी हे दि.०६.०३.२०१८ रोजी दावा मिळकतीमध्ये मशागत करीत असताना प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केला. 'आम्ही मालक झालो आहोत पुन्हा जमीनीत पाय ठेवल्यास पाय तोडून टाकीन' अशी भाषा वापरून कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केला. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी वादी यांच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत

अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई हुकुम मिळण्याची मागणी केली.

५. वादी व प्रतिवादी यांच्या दोन्ही सन्माननीय विधिज्ञांचा युक्तीवाद, त्यांची कथने पटलावरील कागदपत्रे यांचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. सदर मुद्दयांचे निष्कर्ष कारणमींमासेसह खालीलप्रमाणे नमूद करत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी हे सिध्द करतात काय प्रथमदर्शनी दावा वादींच्या बाजूने आहे ? | वादीच्या बाजूने |
| २ | वादी हे सिध्द करतात काय, दाव्याचा समतोल वादींच्या बाजूने आहे? | वादीच्या बाजूने |
| ३ | वादी हे सिध्द करतात काय कधीही न भरून येणारे नुकसान वादींचे होणार आहे ? | वादीच्या बाजूने |
| ४ | आदेश? | आदेशाप्रमाणे |

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u>**

६. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांच्या हक्कास हरकत अडथळा करू नये याच कारणासाठी प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या विरोधात तात्पुरत्या मनाई हुकुमाची मागणी केली आहे. वादी यांच्या सन्माननीय विधीज्ञांना वाटपाचा परिणाम २०१३ मध्ये दर्शविण्यात आला तत्पूर्वी सिना कोळेगाव प्रकल्पासाठीची ८०आर जमीन फेरफार नोंद क्र.१२०३ अन्वये संपादित करण्यात आली. भूसंपादनानंतर प्रत्येकी २६, २७ आर जमीन भूसंपादित झाली. सुभद्राबाई यांचा मृत्युनंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी फेरफार नोंद क्र.१८९७ वादीना डावलून आपली नांवे नोंदवून घेतली त्याबाबतचे आरटीएस

अपील अदयाप प्रलंबित आहे. सदर नोंदीच्या आधारे प्रतिवादी यांनी प्रत्येकी ८०आर जमीनीची विक्री केली. वादी यांच्या ताब्यात दावा मिळकत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या हरकत अडथळयामुळे मनाई हुकुमाची मागणी केली.

७. प्रतिवादी यांच्या सन्माननीय विधीज्ञांनी मयत सुभद्राबाई यांच्या हिश्याला ०हे.८७आर आलेली मिळकत वाटपान्वये प्राप्त झाली त्यामुळे तिला मिळालेली मिळकत ही तिची स्वतंत्र मिळकत होती. दाव्यामध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे स्थान योग्य नाही, प्रतिवादी क्र.३ यांचा सदर क्षेत्राशी संबंध नाही. सदरची कौटुंबिक वाटणी ही दाव्यातील तडजोड हुकुमनाम्याद्वारे करण्यात आली. सदर कौटुंबिक वाटणीत फेरफार नोंद क्र.१०९१ मध्ये वादींना १०/२, १४०/३, १४४/२ या मिळकती प्राप्त झाल्या त्यामुळे नारायण यांच्या हिश्यास त्यांना वाटपामध्ये अनुज्ञेय असणा–या मिळकतीपेक्षा जास्त मिळकती मिळालेल्या आहेत.

८. प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्याकडे दाव्याच्या मिळकतीचे मालक आहे, ताबा आहे, ७/१२ उता–यावर वादीचे नाव नाही, वादी एकत्र कुटुंबाचे सदस्य नाही, विभक्त झालेला आहे. कुटुंब सर्व विभक्त झाल्याचे फेरफार नोंद हा योग्य व पुष्टी देणारा पुरावा ठरू शकतो त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली.

९. प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत व नि.क्र.५ ला दिलेल्या म्हणणेच्या अर्जाद्वारे सुभद्राबाई ही त्यांची आई असल्याचे १०२/३ मध्ये दिलेला तिचा हिस्सा स्वतंत्रपणे वाटपाने मिळालेला आहे हे मान्य केले व ग.क्र.१०/२ मधील ८०आर क्षेत्र भूसंपादित झाले व त्यांनी वादी, प्रतिवादी क्र.१, २ यांचा सुभद्राबाई यांच्या

मिळकतीमध्ये त्यांचा असलेला हिस्सा मान्य केला या बाबींचा विचार करता फेरफार नोंद क्र.१८९७ द्वारे सुभद्राबाई यांच्या मृत्युनंतर वादी यांच्या नावाची नोंद न करता प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नावाची नोंद झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर नोंदीच्या विरोधात आरटीएस अपील दाखल केले व ते प्रलंबित होते. दि.२९.०६.२०१८ रोजीची उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डुवाडी यांनी आदेश करून मंडळ अधिकारी यांचा फेरफार नोंद क्र.१८९७ बाबतचा आदेश रद्द करून तहसिलदार करमाळा यांनी फेर चौकशी करण्याचा आदेश दिला. दि.२९.०६.२०१७ रोजीचा फेरफार नोंद क्र.१९११ दि.१४.०९.२०१७ चा फेरफार नोंद क्र.२१०९ अन्वये प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या नावाची नोंद झाल्याचे दिसून येते व त्या अन्वये प्रतिवादी क्र.१ व २ यांनी शिल्लक ८०आर क्षेत्र ग.क्र.१०२ मधून विक्री केल्याचे दिसून येते. अशा परिस्थीतीत सुभद्राबाई यांनी रे.मु.क्र.२०/९७ मधील तडजोडीद्वारे ८७आर क्षेत्र त्यांच्या नांवे झाल्याचे दिसून येते. सुभद्राबाई यांच्या मृत्युनंतर तिच्या मुलांना व तिच्या पतीचा सदर मिळकतीमध्ये समान हिस्सा राहिला या बाबीचा विचार करता निश्चितच वादी यांचा प्रथमदर्शनी हक्क अधिकार दिसून येतो.

१०. वादी यांच्या शपथपत्राद्वारे त्यांचा ताबा कब्जे वहिवाटीत दावा मिळकत असल्याचे नमूद केले. सदर बाब प्रतिवादी यांनी नाकारली केवळ महसूल दप्तराच्या नोंदीच्या आधारे दावा मिळकत त्यांच्या ताब्यात असल्याचे दिसून येत नाही किंबहुना प्रतिवादी क्र.१ व २ हे पुणे येथे राहत असल्या कारणाने वादी यांच्या ताब्यात दावामिळकत असल्याचे दिसून येते. त्यांची ताबा मिळकत असलेली मिळकतीमध्ये

त्यांच्या हक्कास हितास बाधा आणली अथवा त्यांनी सदर मिळकतीतून बेदखल करण्याचा प्रयत्न केला अशा परिस्थीतीत त्यांच्या हक्कास हितास बाधा निर्माण होवू शकते. दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ अन्वये तात्पुरत्या मनाई हुकुमाद्वारे त्यांच्या हक्काचे संरक्षण करता येवू शकते. फेरफार नोंद क्र.१८९७ याची फेर चौकशी प्रलंबित आहे. अशा परिस्थीतीत प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या नोंदीला आव्हानीत केलेले दिसून येते. त्यामुळे सदर नोंदीवर भिस्त ठेवता येणार नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी दावा मिळकत वादी यांच्या ताब्यात असल्याचे दिसून येते. वादी यांचा देखील सदर मिळकतीवर हक्क ताबा असल्याचे दिसून येते त्यामुळे प्रथमदर्शनी दावा वादी यांच्या बाजूने असल्याचे दिसून येते.

**<u>मुद्दा क्र. २ व ३ करीता</u>**

११. दाव्यातील तडजोडीद्वारे कौटुंबिक वाटणी मध्ये वादी, प्रतिवादी, सुभद्राबाई यांना अधिकार व वाटपात हिस्सा प्राप्त झाला. त्यामध्ये फेरफार नोंद क्र.१७१० दि.०५.०३.२०१८ मध्ये वाटपाचा व प्रत्येक व्यक्तीचे स्थान निश्चित केल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रथमदर्शनी वाटपाचे स्थान निश्चित करून वाटप झाले नाही या प्रतिवादी यांच्या कथनास छेद मिळतो त्यामुळे त्यांनी केलेली विक्री ही कायदयानुसार अनुज्ञेय असणारा हिश्यापेक्षा जास्त क्षेत्राची विक्री केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे वादी यांची दावा मिळकतीत असलेला ताबा व त्यास होणारा हरकत अडथळा दि.०६.०३.२०१८ रोजी प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी केलेली दंडलशाहीची भाषा, धमकी या बाबीचा विचार करता वादी यांच्या हिताचे संरक्षणाकरीता दाव्याचा

समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे दिसून येते. मनाई हुकुमाद्वारे त्यांच्या तात्पुरत्या मनाई हुकुमाचे संरक्षण न झाल्यास त्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होवू शकते या बाबीचा विचार करून मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.४ करीता</u>**

१२. मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्यामुळे मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

## आदेश

१. नि.क्र.५ वरील अर्ज मंजूर.

२. प्रतिवादी क्र.३ व ४ यांना याद्वारे आदेशित करण्यात येते की वादी यांना दावा मिळकत ग.क्र.१०/२ पैकी ०हे.६०आर क्षेत्रामध्ये त्यांच्या ताबे कब्जे वहिवाटीस स्वतः अगर इतरामार्फत हरकत अडथळा करू नये.

RCS No 84-2018

RAJU ASHOK SHIVARATRI

Digitally signed by RAJU ASHOK SHIVARATRI
Date: 2022.06.30 11:50:51 +0530

(रा.अ.शिवरात्री)

दिनांकः–२८.०६.२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, करमाळा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| (a) Name of the Stenographer | :- | Netaji Bharat Labade |
| (b) Court | :- | Jt.CJJD & JMFC, Karmala |
| (c) Order signed by P.O.on | :- | 30.06.2022 |
| (d) Order uploaded on | :- | 30.06.2022 |